REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 4 | JANUARY - 2024

# भारतातील ग्रामीण विकासात — शिक्षण, आरोग्य आणि महिलांचे योगदान

डॉ. प्रियदर्शना जे. नंदेश्वर
(सहाय्यक प्राध्यापक)
न. मा. द. महाविद्यालय, गोंदिया.

## सारांश

भारतीय अर्थव्यवस्था हे कृषिप्रधान अर्थव्यवस्था आहे. कृषी क्षेत्रावर मोठ्य प्रमाणात लघु व कुटीर उद्योगांचा व्याप अवलंबून आहे. भारतात १९५०—५१ मध्ये ८२% लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्याला होती. सन १९७०—७१ मध्ये ८०% लोकसंख्या ग्रामीण भागात राहत होती. आजही एकूण लोकसंख्येपैकी ८२.२५ कोटी लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. त्यामुळे आर्थिक नियोजनाद्वारे राष्ट्रीय विकास साधण्यासाठी ग्रामीण विकास अत्यंत आवश्यक आहे. कोणत्याही देशात ग्रामीण समाज उल्लेखनीय कामगिरी बजावत असते. अन्नधान्य आणि उद्योगाला लागणारा कच्चामाल यांचे उत्पादन ग्रामीण भागात होते.



### अ) ग्रामीण विकासाचे क्षेत्र

१) कृषी क्षेत्र   २) औद्योगिक क्षेत्र   ३) सेवा क्षेत्र

**ब) ग्रामीण क्षेत्रातील महिला व मुलांचा ग्रामीण विकासात सहभाग**

**क) कृषी क्षेत्र आणि ग्रामीण महिलांचे सबलीकरण**

**ड) ग्रामीण विकासाच्या समस्याचे स्वरुप**

१) शिक्षण

२) भारतातील आरोग्याच्या समस्या

## बिजशब्द —

**१) महिलांचे सक्षमीकरण** :— भारतात आज १४१कोटी लोकसंख्या आहे. यातील ८५ कोटी लोकसंख्या ग्रामीण भागात आहे. ग्रामीण विकासास वाढ करण्यासाठी ग्रामीण स्त्रियांच्या सबलीकरणावर सरकारने खर्च वाढविणे आवश्यक आहे.

२) **आरोग्यावरील खर्च** — २०२० मध्ये जागतिक स्तरावर प्रति व्यक्तीच्या आरोग्यावर फ्रांसमध्ये ४७६९ डॉलर, श्रीलंका १५१ तर भारतात फक्त ५७ डॉलर तर जीडीपी मध्ये ३.३७ टक्के राशी खर्च केल्या जाते.

३) **शिक्षणावरील खर्च** — १९८६ च्या शिक्षण धोरणानुसार शिक्षणावर होणारा खर्च जीडीपी च्या ६ टक्के राशीची शिफारस केली. परंतु आज भारतात फक्त २.५ टक्के राशी खर्च केली जाते.

उपाययोजना —

१) स्त्री — पुरष समानता प्रस्तापित करणे

२) शिक्षणावरील खर्च जीडीपीच्या २.५ टक्के वरुन ६ टक्के करण्यात यावे.

३) आरोग्यावरील खर्च जीडीपी च्या ३.३७ टक्के वरुन किमान १० टक्के पर्यंत वाढविणे.

• शहरांच्या आवश्यक गरजा या सुद्धा ग्रामीण उत्पादन (शेतमाल) उत्पादनातून भागविल्या जातात. शिवाय शहरातील औद्योगिक क्षेत्राकरिता होणारा श्रमपुरवठा करण्याची महत्त्वपूर्ण कार्य ग्रामीण भागातूनच केली जाते. देशातील बहुतांश नैसर्गिक साधन संपत्ती ग्रामीण भागात असते आणि तिथेच लोकांच्या वसाहती तयार होतात. त्यामुळे देशाची आर्थिक वृद्धी हे ग्रामीण विकासावर गती देत असते. ग्रामीण विकासाच्या विस्तृत संकल्पनेचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. ग्रामीण विकासाच्या सर्वसामान्य अर्थ, ग्रामीण भागाचा एकूण विकास ज्यामुळे जीवनमानाच्या गुणवत्ते सुधारणा होते.

सन २०११ च्या जनगणनेनुसार देशातील ग्रामीण लोकसंख्या ८३.२५ कोटी इतकी आहे. त्यामुळे ग्रामीण विकास होणे आवश्यक आहे. ग्रामीण विकासात सर्वसामान्यपणे दारिद्र्य निर्मूलन करणारा सर्वसमावेशक व शाश्वत असणे अपेक्षित आहे. भारत सरकार दरवर्षी विविध मार्गातून ग्रामीण विकास करण्याचा प्रयत्न करत असते.

ग्रामीण विकासाची जागतिक बँकेने केलेली व्याख्या, " ग्रामीण विकास ही एक अशी व्यूवरचना आहे की ज्यामुळे ग्रामीण भागातील विशिष्ट लोकांचे आर्थिक व सामाजिक जीवनमान उंचावण्यास मदत होते तसेच निर्वाहाच्या पातळी गुंतवण्यास मदत होते." ग्रामीण विकास हे आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्टासह एकत्रित केलेली प्रक्रिया आहे. ग्रामीण विकासामुळे समाजातील सामाजिक आणि आर्थिक बदल केले जातात तसेच ग्रामीण लोकांसाठी अधिक चांगल्या आणि सुरक्षित उपजीविका प्रदान करणे केले जाणे आवश्यक असते. त्यामुळे अर्थव्यवस्थेत ग्रामीण भागाचा विकास हा देशाच्या विकासाचा पाया आहे.

अ) ग्रामीण विकासाचे क्षेत्र —

**१) कृषी क्षेत्र :—** भारतातील ग्रामीण लोकसंख्येचे कृषी क्षेत्रात विभाजन होते. शेती आणि संबंधित क्षेत्र उदाहरणार्थ वृक्षारोपण, वनीकरण, मत्स्यव्यवसाय, दुग्ध व्यवसाय, बागायती शेती यांचा समावेश असतो.

**२) औद्योगिक क्षेत्र :—** ग्रामीण भागातून उत्पादन केलेल्या कच्चा मालावर प्रक्रिया करून औद्योगिक क्षेत्र निर्माण होत असतात. यामध्ये लघु उद्योग, कुटीर उद्योग, ग्रामीण विकासात या उद्योगांचे महत्त्वपूर्ण योगदान असते.

**३) सेवा क्षेत्र :—** या क्षेत्रामध्ये व्यापार व अंतिम ग्राहक सेवांचा समावेश होतो. उदाहरणार्थ व्यापार सेवा, उपहारगृह, पर्यटन आणि मनोरंजन इतर.

ग्रामीण क्षेत्रातील महिला व मुलांचा ग्रामीण विकासात सहभाग :—

**१) ग्रामीण महिलांचे सबलीकरण :—** ग्रामीण महिलांना त्यांचे ज्ञान, कलाकौशल्य आणि लघु व्यवसाय निर्मितीसाठी सक्षम बनविणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील महिलांसाठी छोटे छोटे उद्योग सुरू करून त्यांच्या मोठ्या उद्योगाची रूपांतर झाल्याचे अनेक उदाहरणे दिसत आहेत. उदाहरणार्थ लिज्जत पापड उद्योग हा अशिक्षित महिलांनी उभारलेला मोठा उद्योग आहे

**२) महिलांचे आर्थिक सबलीकरण :—** आजही आपल्या देशात असंघटित क्षेत्रामध्ये स्त्री—पुरुषांच्या वेतनासंबंधी भेदभाव दिसून येतो. त्यासाठी ग्रामीण विकासाच्या विविध योजनाद्वारे महिलांचे आर्थिक सबलीकरण करणे हा मुख्य उद्देश असतो. महिलांच्या आर्थिक सुरक्षिततेसाठी "महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना" या योजनेत महिलांसाठी अनेक तरतुदी आहेत.

**३) राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका कार्यक्रम :—** एन. आर. एच. एम. ग्रामीण भागातील महिलांना आर्थिक सुरक्षा आणि सक्षमीकरणाची संधी दिली जाते.

**४) राष्ट्रीय महिला कोष योजना :—** ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील महिलांना दरमहा निधी दिला जातो. त्यांना उद्योग व स्वयं सहायता गटाची योजना सुरू केल्या आहेत. त्यामुळे महिलांना उद्योजकांना प्रोत्साहन दिले जाते.

**५) प्रधानमंत्री जनधन योजना :—** या योजनेत लाखो महिलांचे बचत खाते अधिकोषात जोडले आहेत. भारतात जवळपास ५० ते ५५ % ग्रामीण महिलांच्या बचत खाते अधिकोषाशी जोडली गेली आहेत.

**६) प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना :—** या योजनेअंतर्गत ग्रामीण लोकसंख्येला दारिद्र्यातून बाहेर काढण्यासाठी आणि रोजगार उपलब्ध करून दिले जातात.

**७) सुकन्या समृद्धी योजना :—** या योजनेअंतर्गत : बेटी बचाव बेटी पढाव : या अंतर्गत ९२ लाख खाती राष्ट्रीयकृत बँकेत सुरू करण्यात आलेली आहेत. अशा प्रकारे ग्रामीण विकास साध्य करण्यासाठी विविध योजना राबविल्या जात आहेत. ग्रामीण महिलांच्या एकत्रीकरणासाठी आणि त्यांची क्षमता वाढविण्यासाठी आवश्यक असलेल्या आधारभूत उपायसह अनेक सामाजिक आणि आर्थिक पर्यायाची संधी देण्यात आली आहे. महिलांना उद्योग व व्यापार आणि उत्पादनासाठी पतपुरवठा करणे. सूक्ष्म पतपुरवठा यंत्रणा आणि बचत गटात सारख्या सूक्ष्म वित्त संस्थांची स्थापना करण्यात आली आहे.

### क) कृषी क्षेत्र आणि ग्रामीण महिलांचे सबलीकरण

कृषी क्षेत्राच्या प्रगतीमध्ये ग्रामीण महिलांचे योगदान महत्वपूर्ण आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत ७२% महिलांचे सर्वाधिक काम हे अदृश्य स्वरूपात असते. शिवाय राष्ट्रीय उत्पन्नात या अदृश्य कामाची नोंद केली जात नाही. भारतासारख्या परंपरा प्रिय ग्रामीण जनतेला आधुनिक आणि शास्त्रीय दृष्टिकोन पटवून देऊन तिला आर्थिक विकासाच्या मार्गावर आणण्यासाठी सरकारला विविध योजनाच्या माध्यमातून कार्य करावे लागते. आर्थिक विकासाच्या आड येणाऱ्या सामाजिक रूढी व परंपरा, चालीरीती यांच्या ग्रामीण जीवनातील वर्चस्व कमी व्हावे म्हणून शिक्षणाचा आणि दळणवळणाच्या सोयी भरपूर प्रमाणात केल्या गेल्या आहेत .

### ३) ग्रामीण विकासाच्या समस्याचे स्वरूप

**अ) आर्थिक व्यवसायांचा विकास करणे :—** कृषीप्रधान अर्थव्यवस्थेचे मुख्य लक्षण म्हणजे बहुसंख्य लोकांचे उत्पन्न हे खूप कमी असते की ज्यामध्ये त्यांचा जीवन निर्वाह सुद्धा केला जाऊ शकत नाही. आजही ६५% लोकसंख्या ही शेती क्षेत्रावर अवलंबून आहे आणि त्यांची उत्पादकता ही खूप कमी आहे. यामुळे या क्षेत्रामध्ये लघु व कुटीर उद्योगांचा विकास करणे आवश्यक आहे. कृषी क्षेत्रातील झालेल्या उत्पादनाचे किंवा शेतमालाचे विक्री करणे ही गंभीर समस्या आज दिसून येत आहे. उदा. अन्नधान्य तांदूळ व गहू यांच्या आधारभूत किंमती सरकार ठरवतो. ज्या उत्पादन खर्चापेक्षा खूप कमी असतात. शेतमाल उत्पादनावर मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो.

सरकार निर्यातीवर मोठ्या प्रमाणात कर आकारत असते. उदा. कांदे लागवड करणारे शेतकरी आज हवालदिल झाले आहेत. त्यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाले परंतु कांदा निर्यातीसाठी सरकारची भूमिका ही अधिक कठोर आहे. अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या समस्या हे ग्रामीण विकासातील एक मोठी समस्या आहे. ही समस्या दूर करण्यासाठी शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य बाजारपेठ, योग्य वाजवी किंमत, संग्रहणाच्या सोयी तसेच वित्त पुरवठा मोठ्या प्रमाणात व्हायला पाहिजे.

**शिक्षण आणि आरोग्य :—** यासारख्या सामाजिक सुविधांचा विकास ग्रामीण विकासात महत्त्वपूर्ण बाब म्हणजे शिक्षण आणि आरोग्य होय.

**१) शिक्षण :—** देशाच्या सर्वांगीण विकासात शिक्षणाला महत्त्वपूर्ण स्थान आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ४५ नुसार १४ वयोगटाखालील सर्व मुलांना प्राथमिक शिक्षण हे सरकारने निशुल्क आणि अनिवार्य द्यायला पाहिजे. परंतु आज हे चित्र वेगळे दिसत आहे. सरकारने नवीन शिक्षा धोरण २०२० (NEP - 2020) यानुसार ग्रामीण भागातील प्राथमिक शाळेत त विद्यार्थी संख्या २० पेक्षा कमी आहे, त्या

प्राथमिक शाळा बंद करण्याचे धोरण राबविले जात आहे. जेणेकरून ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थी शिक्षणापासून वंचित करणे. देशात ग्रामीण विकास साध्य करणे कठीण होईल.

भारतातील समाज प्रवर्तक क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी ०४ विद्यार्थ्यांना एकत्र घेऊन पुण्यामध्ये शाळा सुरू केल्या. स्वत:च्या आर्थिक बळावर परंतु सरकार आज ग्रामीण भागात शाळा बंद करून कोणता ग्रामीण विकास साध्य करणार. हा एक महत्त्वाचा प्रश्न आज दिसत आहे. महाराष्ट्र शासन महाराष्ट्रातील ६,६०० जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बंद करण्याचे आदेश काढले आहे. ज्यामुळे १,३२,००० विद्यार्थी शिक्षणापासून वंचित होतील.

नवीन शिक्षण धोरणामुळे भारतातील शिक्षणाचे निरबुद्धीकरण सुरू झाले आहे. मात्र त्यांची खंत कुणाला वाटत नाही हे जास्त गंभीर आणि लाजिरवाणे आहे. आज गुणवत्तापूर्ण शिक्षण हे देशापुढील सर्वात मोठे आव्हान आहे. देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या केवळ २% खर्च शिक्षणावर होतो तर विज्ञान आणि तंत्रज्ञानावर १% खर्च होत नाही. भारतीयांच्या आंधळेपणाची फटका शिक्षणाला बसत आहे. भारतात गेल्या दहा ते पंधरा वर्षांपासून शिक्षण क्षेत्र हे व्यापार केंद्र करण्यात आले आहे. प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षण आणि महाविद्यालयीन शिक्षण हे सर्व व्यापाराचे केंद्र तयार करण्यात सरकारी यशस्वी झाली आहे. परदेशात विद्यापीठांची शैक्षणिक उंची वाढवण्यासाठी प्रयत्न केला जातात आणि आपल्या देशात शिक्षणाचे दुर दुर संबंध नसणारे लोक देशाचे शिक्षण मंत्री झाले झालेले दिसतात. यामुळे देशातील बिघडत चाललेली शिक्षण व्यवस्था ग्रामीण विकासात किती महत्त्वपूर्ण ठरणार. मराठीत आचार्य (Ph. D.) पदवी प्राप्त करणारा व्यक्तिला काय दिवे लावणार ? अशा शब्दात सरकार बेजबाबदार मंत्राकडून टवाळकी केली जाते.

कोठारी आयोगाच्या शिफारशीनुसार १९८६ मध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण (NPE) व्दारे पुनरुच्चार करण्यात आला, NPE ने म्हटले की “शिक्षण ही देशाच्या भविष्यासाठी सर्वात महत्वाची गुणवणूक आहे.” आणि त्यासाठी देशाने आपल्या राष्ट्रीय उत्पनाचा किमान ६% राशी शिक्षणावर खर्च केला पाहिजे.

**जगातील विविध देशास शिक्षणावर होणारा खर्च (वर्ष २०१९)**

| अं.क्रं. | देश | GDP च्या % |
|---|---|---|
| १ | नार्वे | ६.६ % |
| २ | चिल्ली | ६.५ % |
| ३ | इज्राईल | ६.२ % |
| ४ | आस्ट्रेलिया | ६.१ % |
| ५ | U.K./U.S | ६.० % |
| ६ | भारत | २.५ % |
| ७ | जापान | ४.० % |

## २) भारतातील आरोग्याच्या समस्या

आज १.३ अब्ज लोकसंख्येसह भारत हा भारत जगातील सर्वात मोठा आणि सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. भारताला अजूनही आरोग्य विषयक आव्हानांना सामना करावा लागतो जसा प्रतिकूल परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असतो. भारतात ग्रामीण भागात आरोग्याच्या सोयी सुविधा मोठ्या प्रमाणात मिळाव्या यासाठी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (NRHM) याची सुरुवात प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी १२ एप्रिल २००५ रोजी केली. या अभियानाचा उद्देश ग्रामीण लोकसंख्या, गरीब जनतेला परवडणारी आणि दर्जेदार आरोग्य सेवा प्रदान करण्याचा होता. यासोबतच सामुदायिक प्रयत्नात सह सेवा प्रदान करण्यासाठी सामाजिक आरोग्य कार्यक्रम आणि आशा वर्कर ची नियुक्ती करण्यात आली.

**भारतातील सामुदायिक आरोग्याच्या एका अहवालावरून खालील निष्कर्ष :**

१) भारतातील ३ वर्षाखालील ४२% मुले कुपोषित आहेत.

२) भारतातील ३ व्यक्ती पैकी फक्त एकाला शौचालयाच्या सुविधा उपलब्ध आहेत.

३) भारतातील एच. आय. व्ही एड्स चे प्रमाण निरंतर वाढत आहेत.

**४) असंसर्गजन्य रोग** :— जे देशातील एकूण मृत्यू पैकी ६०% मृत्यू हृदय रोग, मधुमेह, कर्करोग आणि श्वसन रोग यामुळे होतात.

**५) संसर्गजन्य रोग :—** उदाहरणार्थ क्षयरोग, मलेरिया, डेंगूताप यासारखे संसर्गजन्य आजार हे आरोग्यासाठी महत्वपूर्ण आव्हान आहे. जागतिक प्रमाणात २५% पेक्षा जास्त क्षय रोगी भारतात आहेत.

**६) माता व बाल आरोग्य :—** भारत हा जगातील सर्वाधिक माता मृत्युदरांपैकी एक आहे. दरवर्षी ४४,००० माता मृत्यूची नोंद होते. तर बालमृत्यू दरही उच्च आहे. प्रति १००० जन्मामागे २८ मृत्यू असा आहे.

**७) मानसिक आरोग्य :—** ज्यामध्ये २५% लोकसंख्या ही आधुनिक उपकरणाने आणि इतर कारणाने ही नैराश्यात जीवन जगत आहे.

**८) पर्यावरणीय आरोग्य :—** भारतात जल, वायू आणि औद्योगिक प्रदूषण हे चिंतेची बाब आहे. भारतात दिल्ली तर महाराष्ट्रामध्ये चंद्रपूर हे शहर आरोग्यासाठी वायू प्रधान वायू प्रदूषणामुळे दूषित झाले आहे.

**९) कुपोषण :—** भारतात कुपोषण आणि सूक्ष्म अन्नद्रव्याच्या कमतरतेमुळे कुपोषणाचे प्रमाण वाढत आहे. नॅशनल फॅमिली हेल्थ च्या सर्वेक्षणानुसार ०—५ वर्षाखालील ३८% मुलांची वाढ खुंटलेली आहे तर ३०—४०% टक्के लोकसंख्या एनीमियाने ग्रस्त आहे.

**१०) पिण्याचे शुद्ध पाणी :—** आजही भारतात ८०% लोकसंख्येला पिण्याचे शुद्ध आणि स्वच्छ पाणी मिळत नाही.

**जगातील प्रतिव्यक्तीच्या आरोग्यावर होणारा खर्च**

**खर्च डॉलर मध्ये (+ चिन्ह डालर)**

| अं.क्रं. | देशाचे नाव | वर्ष २०१८ | २०१९ | २०२० |
|---|---|---|---|---|
| १ | संयुक्त राष्ट्र | १०२८५ | १०६६१ | ११७०२ |
| २ | श्रीलंका | १५९ | १४२ | १५१ |
| ३ | फ्रॉन्स | ४६६९ | ४५०८ | ४७६९ |
| ४ | भुटान | १०२ | ११५ | १३४ |
| ५ | भारत | ५८ | ६१ | ५७ |

वरील अहवालावरून असे स्पष्ट होते, कि भारत सरकार आरोग्य सेवेवर अत्यंत कमी प्रमाणात खर्च करते. २०१९—२० या वर्षासाठी भारतातील एकूण लोकसंख्येवर जीडीपीच्या ३.२७ % राशी खर्च केली आहे. युनायटेड स्टेट्स (US) मध्ये हा दर जीडीपीच्या १६.६ % आहे. यावरून हे स्पष्ट होते की भारत सरकार आरोग्यावर अतिशय अल्प प्रमाणात खर्च करत आहे.

अशाप्रकारे भारतात ग्रामीण विकासात, शिक्षण, आरोग्य यासारख्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधांमध्ये केलेली गुंतवणूक अत्यंत कमी आहे. त्यामुळे दारिद्र्याचे प्रमाण आणि मृत्यूचे प्रमाण हे वाढत आहे.

## संदर्भ ग्रंथ :—

१. ग्रामीण विकास विकिपीडिया

२. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अहवाल (२०२१—२२)

३. भारतातील आरोग्य व शिक्षण विकिपीडिया

४. लोकसत्ता दैनिक वृत्तपत्र, शिक्षण परिषद पुणे २०२३ डिसेंबर

५. लोकसत्ता दैनिक वृत्तपत्र शिक्षण परिषद चंद्रपूर २०२३ डिसेंबर

६. भारतीय राष्ट्रीय पोर्टन (Indiv.gov.in)
७. ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार
८. https://www.statista.com/statistics